# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 November 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १७ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात, महाविकास आघाडीची समारोपाची जाहीर सभा आज मुंबईत होणार
- राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचा विजय होईल - केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांना विश्वास, तर भाजपने देशात फूट पाडण्याचं काम केल्याची काँग्रेसची टीका
- भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाच्या अध्यक्षपदी दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती

आणि

- विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावण्यासाठी विविध उपक्रम

****

राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला आहे. उद्या १८ तारखेला प्रचार संपणार असून, शेवटचे दोन दिवस सर्व पक्षांचे उमेदवार जोमाने प्रचार करत आहेत. येत्या बुधवारी २० नोव्हेंबरला मतदान असून, एकूण चार हजार १३६ उमेदवारांचं भवितव्य ठरणार आहे. यावेळी निवडणूक रिंगणात ३६३ महिला उमेदवार आहेत.

महाविकास आघाडीची समारोपाची जाहीर सभा आज मुंबईत होणार आहे. या सभेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

****

केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नागपूर इथं वार्ताहर परिषद घेतली. राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचा महाविजय होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली महायुती सरकारने राज्यात जी विकासकामं केली आहेत, त्यामुळे राज्यातला मतदार नक्कीच महायुतीच्या बाजूने उभा राहील, असं ते म्हणाले. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी अकोला इथं, तर आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी आज चांद्रपूर जिल्ह्यात बल्लारपूर इथं जाहीर सभेला संबोधित केलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नंदुरबार जिल्ह्यात धडगाव इथं, तसंच धुळे जिल्ह्यात साक्री मतदारसंघातल्या दहिवेल इथं सभा घेतली. भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात रोड-शो केला. त्यानंतर त्यांनी दुपारी चांदवड इथं प्रचारसभा घेतली.

****

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, उत्तर प्रदेशाच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांनी पुण्यात प्रचार सभा घेतली. स्वबळावर सरकार आणण्याचा बसपचा प्रयत्न आहे, पंरतू, योग्य संख्याबळ आलं नाही तर सरकार बनवणाऱ्या पक्षाला समर्थन देवून आणि सरकारमध्ये सहभागी होवून लोकांना न्याय देवू, असं आश्वासन मायावतीं यांनी यावेळी दिलं.

****

पंडित जवाहरलाल नेहरू आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या नेत्यांनी लोकशाहीच्या रक्षणासाठी आपलं आयुष्य वेचलं, पण, भारतीय जनता पक्षाने मात्र देशात फूट पाडण्याचं काम केलं, अशी टीका, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली. नागपूरजवळ उमरेड इथं प्रचारसभेत ते आज बोलत होते. राज्यात आता मतदारांना सरकार बदलायचं असल्याचं ते म्हणाले.

काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी यांनी आज गडचिरोली इथं प्रचारसभा घेतली. महायुतीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले उद्योग गुजरातमध्ये नेण्यात आले, असा आरोप त्यांनी केला. त्यानंतर गांधी या नागपूर इथं काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांच्या प्रचारार्थ काढलेल्या रॅलीत सहभागी झाल्या होत्या.

****

जालना जिल्ह्यात भाजप महायुतीचे भोकरदनचे उमेदवार संतोष दानवे यांनी आज वालसा वडाळा, डोनगाव, निवडुंगा, पोखरी बुटखेडा इथं प्रचार फेरी काढली. जालना विधानसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारार्थ आज जालना शहरातल्या विविध भागातून प्रचार फेरी काढण्यात आली. जालना इथं आयोजित महायुतीच्या मेळाव्यात माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी महायुतीचे उमेदवार अर्जुन खोतकर यांना निवडून देण्याचं आवाहन केले. तर घनसावंगी विधानसभा मतदारसंघातले राष्ट्रवादी काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार राजेश टोपे यांनी आज मतदार संघातल्या नालेवाडी, शहागड, वाळकेश्वर, अंतरावाली सराटीसह मतदार संघातील विविध गावात प्रचार दौरा करून मतदारांशी संवाद साधला.

****

येत्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेते भारत गणेशपुरे यांनी केलं आहे.

**बाईट – अभिनेते भारत गणेशपुरे**

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज सांगली जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या विकासात अग्रणी भूमिका निभावली असून, मराठी माणसाला सक्षम बनवलं, असं त्यांनी समाजमाध्यवारील संदेशात म्हटलं आहे.

****

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४ साठी आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाच्या अध्यक्षपदी चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा महोत्सव २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान गोव्यात आयोजित करण्यात आला आहे. आशुतोष गोवारीकर यांनी या

नियुक्तीबाबत आनंद व्यक्त केला असून, काळानुसार विकसित होणारा सिनेमा पाहण्यासाठी या महोत्सवापेक्षा दुसरी चांगली संधी नाही असं म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी विविध ठिकाणी उपक्रम राबवले जात आहेत. परभणी जिल्हाधिकारी कार्यालय आणि मतदान जनजागृती विभाग तसंच परभणी जिल्हा सायकल संघटनांच्या वतीनं आज शहरात सायकल रॅली काढण्यात आली. प्रारंभी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या उपस्थितीत सर्वांना मतदान करण्यासंदर्भात शपथ देण्यात आली. समारोपात सहभागी सायकलपटूंना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आलं. या रॅलीत ८ वर्षांपासून ते ६० वर्षांपर्यंत सायकलस्वार सहभागी झाले होते.

धाराशिव इथं राष्ट्रीय सेवा योजना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप-परिसरातल्या नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने आज शहरात मतदान जागृतीपर पथनाट्य सादर करून जनजागृती करण्यात आली.

धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर तालुक्यातल्या सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालय यांच्यामार्फत आज मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत मतदानाचे महत्व पटवून देत मतदान करण्याबाबत मतदारांमध्ये जागृती करण्यात आली.

पालघरमध्ये देखील आज सकाळी रन फॉर वोट चं आयोजन करण्यात आलं होतं. यात तीन किलोमीटर आणि पाच किलोमीटर मॅरेथॉनमध्ये पालघर शहर, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्र तसंच पालघर जिल्ह्यातल्या शाळा-महाविद्यालयातले विद्यार्थी तसंच नागरीकांनी सहभाग घेतला होता.

****

विधानसभा निवडणुकीचा प्रचार उद्या संपत असून, त्यानंतर मतदानापर्यंतच्या ७२ तासांत कायदा सुव्यवस्था अबाधित राखून मतदारांना निर्भय वातावरण उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आज छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. अखेरच्या ७२ तासांत वाहनांची तपासणी, छुप्या पद्धतीने केले जाणारे प्रचार, मतदारांना प्रलोभन दाखवण्याचे प्रकार, त्यासाठी

केले जाणारे प्रयत्न, अशा घटनांची तात्काळ दखल घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.
नांदेड जिल्ह्यात देखील सर्वत्र चोख बंदोबस्त करण्यात आला असून, निर्भय आणि पारदर्शी वातावरणात मोठ्या संख्येनं नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात औरंगाबाद पश्चिम विधानसभा मतदारसंघात ४०४ ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांनी गृह मतदानाचा हक्क बजावला. मतदारसंघात ९५ टक्के गृह मतदान झालं. तर औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघात १७६ जणांनी गृह मतदान केलं असून, हे प्रमाण ९६ टक्के इतकं आहे.
धाराशिव जिल्ह्यात परांडा विधानसभा मतदारसंघात गृहमतदान सुरू असून, पहिल्या दिवशी ४३७ ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. उद्यापर्यंत हे मतदान चालणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यात एकूण ३ हजार ८८ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. जिल्ह्यामध्ये प्रत्येकी नऊ महिला संचलित मतदान केंद्र, दिव्यांग अधिकारी असलेले मतदान केंद्र, युवा मतदान केंद्र आहेत. जिल्ह्यात किनवट मधील पांगरपाड, हदगाव मधील चोरंबा, भोकर मधील पाकी तांडा, देगलूर मधील रामतीर्थ आणि मुखेड मधील कोलेगाव हे पाच संवेदनशील केंद्र असून, या ठिकाणी केंद्रीय राखीव दलाचे कर्मचारी तैनात केले जाणार आहेत.

****

विशेष पोलीस निवडणूक निरीक्षक दीपक मिश्रा यांनी आज नांदेड आणि लातूर जिल्ह्याचा निवडणूक विषयक तयारीचा आढावा घेतला. प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याने संवेदनशिलतेने निवडणुकीचं काम करावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

हिंगोली जिल्ह्यात वसमत तालुक्यातल्या चिखली फाट्यावर 'स्थिर निगराणी' पथकाने एका ट्रॅव्हल्समधून जवळपास ९० लाख रुपये रक्कम जप्त केली. ही बस मुंबईहून नांदेडकडे जात होती.

****

बुलडाणा जिल्ह्यात समाज माध्यमांवर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्या प्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खामगाव शहरात ही कारवाई केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यात निवडणूक कामात हयगय करणाऱ्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गडचिरोली विधानसभा मतदारसंघात पोर्ला इथले क्षेत्रीय अधिकारी राकेश मडावी प्रशिक्षण सत्रास अनुपस्थित होते, त्यामुळे मतदान यंत्र तयार करण्याच्या कामात व्यत्यय निर्माण झाल्यानं, ही कारवाई करण्यात आली.

****